# जाहीर प्रकटन

## जिल्हाधिकारी पालघर येथील सेतु सुविधा केंद्रामार्फत कंत्राटी तत्वावर पदांची भरती

मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पांतर्गत पालघर जिल्ह्यातील पालघर, वसई, डहाणू व तलासरी या तालुक्यातील जमीन संपादित करण्यात येत आहे. जमीन संपादित करण्यात येणाऱ्या गावांचे न्याय नुकसान भरपाई मिळण्याचा आणि पुनर्वसन व पुनर्वसाहत यामध्ये पारदर्शकता राखण्याचा अधिनियम, २०१३ मधील अनुसूची तीन प्रमाणे संपादित गावामध्ये मुलभूत सोयी सुविधा देण्याबाबतचा आराखडा तयार करणे व त्याची अंमलबजावणी प्रभावीपणे करण्यासाठी संचालक, सेतु सुविधा केंद्र, पालघर यांचेमार्फत ठोक मानधनावर कंत्राटी पध्दतीने ११ महिन्याकरीता खालील नमुद तक्त्यातील पदे मुंबई अहमदाबाद हाय स्पीड रेल्वे प्रकल्पाकरीता निव्वळ कंत्राटी स्वरुपात भरण्यासाठी पात्र उमेदवारांनी अर्ज /फोटो व शैक्षणिक पात्रता /अनुभवाच्या कागदपत्रांच्या छायांकीत प्रतीसह मुलाखतीसाठी दि.२९/०१/२०१८ रोजी सकाळी ११.०० वाजता जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, पार्श्वनाथ ९, बिडको नाका, पालघर (प.), जि.पालघर येथे उपस्थित रहावे. अर्जांचा विहीत नमुना मा.जिल्हाधिकारी पालघर यांच्या www.collectorpalghar.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

| अ.क्र. | पदाचे नाव | पदांची संख्या | शैक्षणिक अर्हता व अनुभव | मासिक देय मानधन (दरमहा) |
|---|---|---|---|---|
| १. | प्रकल्प अधिकारी | १ | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असावा.<br>२) संगणकाचे ज्ञान आवश्यक<br>३) किमान २ वर्षाचा प्रकल्प अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असावा. | ६५,००० |
| २. | सहाय्यक प्रकल्प अधिकारी | १ | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कोणत्याही शाखेचा पदव्युत्तर असावा.<br>२) संगणकाचे ज्ञान आवश्यक<br>३) किमान २ वर्षाचा सहाय्यक प्रकल्प अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असावा. | ५०,००० |
| ३. | संशोधन अधिकारी | २ | १) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा पदव्युत्तर असावा.<br>२) संगणकाचे ज्ञान असावे.<br>३) २ वर्षाचा संशोधन अधिकारी म्हणून कामाचा अनुभव असावा. | ३०,००० |
| ४. | समन्वयक | १० | १) Master degree in Social Work (MSW), Social Sciences from recognized University.<br>२) कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य | २०,००० |
| ५. | डाटा एंन्ट्री ऑपरेटर | ३ | १) एच.एस.सी पास किंवा पदवीधर असावा.<br>२) संगणकाचे ज्ञान असावे.<br>३) मराठी व इंग्रजी टंकलेखनाचे ज्ञान असावे.<br>४) कामाचा अनुभव असणाऱ्यांना प्राधान्य | १०,००० |

MICROSONIC PERIPHERALS THANE

**निवड पध्दती :-**

१) जाहिरातीनुसार इच्छुक उमेदवारांची थेट मुलाखत **(Walk-in-Interview)** घेऊन पात्र उमेदवारांची कंत्राटी पध्दतीने निवड करण्यात येईल. निवड करण्यात आलेला उमेदवार हजर न झाल्यास रिक्त पदांच्या प्रमाणात तयार करण्यात आलेल्या प्रतिक्षा यादीतील पुढील उमेदवारास संधी देण्यात येईल.

२) उमेदवाराची निवड /प्रतिक्षा यादीत निवड झाली याचा अर्थ नियुक्तीचा हक्क प्राप्त होणार नाही.

३) पात्र उमेदवार यांची यादी जिल्हाधिकारी कार्यालयाच्या वेबसाईटवर (www.collectorpalghar.in) प्रसिध्द केली जाईल.

४) सदर नेमणूक पुर्णत: तात्पुरत्या स्वरुपाची असून फक्त ११ महिन्यांच्या कालावधीसाठी करार पध्दतीने देण्यात येईल.

५) सदर पदावरील उमेदवारांचे मानधन संचालक, सेतु सुविधा केंद्र पालघर यांचेमार्फत अदा केले जाईल.

६) सदर पदावर नेमणूक केलेल्या उमेदवाराला नेमणूक संपुष्टात आल्यानंतर त्यापुढे सदर पदावर कोणत्याही प्रकारचा हक्क सांगता येणार नाही किंवा शासन सेवेत समाविष्ट करुन घेण्याची मागणी करता येणार नाही किंवा त्यासाठी कोणत्याही न्यायालयात दाद मागण्याचा अधिकार असणार नाही.

७) उमेदवाराची ज्या पदासाठी निवड केली जाईल, त्या पदावर व संबंधित ठिकाणी हजर होणे उमेदवारावर बंधनकारक राहील.

८) निवड प्रक्रिया कोणत्याही कारणास्तव व कोणत्याही क्षणी रद्द करण्याचा हक्क राखून ठेवण्यात येत आहे.

**सर्वसाधारण अटी व शर्ती :-**

१) सदरची नेमणूक ही करार (कंत्राटी) पध्दतीने असल्यामुळे त्यांना शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाही.

२) सदर पदाची मुदत ११ महिने असून आवश्यकता असल्यास सदर मुदत एकावेळी ११ महिन्यापर्यंत वाढविता येईल.

३) निवड झालेल्या उमेदवारास एकत्रित मानधन या व्यतिरिक्त इतर कोणतेही अनुज्ञेय राहणार नाही.

४) कोणत्याही प्रकारची पूर्व सूचना न देता पदावरुन कमी करण्यात येईल.

५) उमेदवार शारीरिक दृष्ट्या सुदृढ असावा.

६) मुलाखतीस येताना मुळ कागदपत्रे सोबत आणणे आवश्यक आहे.

७) सदर पदासाठी उमेदवाराने आपले पूर्ण नाव, टपालाचा पूर्ण पत्ता पिनकोडसह, मोबाईल / दुरध्वनी क्रमांक, ई-मेल आयडी, जन्मतारीख, अधिवास प्रमाणपत्र, शैक्षणिक अर्हता व अनुभव विषयक माहिती (Bio Data) साक्षांकीत प्रती समाविष्ट असेल अशा प्रकारचा अर्ज संचालक, सेतु सुविधा केंद्र पालघर यांचे नांवे सादर करणे आवश्यक राहील.

८) उमेदवाराने अर्जावर आपला सक्षम अधिकाऱ्याने साक्षांकित केलेला फोटो चिकटविणे आवश्यक आहे व असा अर्ज **दिनांक २९/०१/२०१८** रोजी सकाळी ११.०० वाजता भूसंपादन शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, पालघर येथे दाखल करण्यासाठी उमेदवारांनी उपस्थित रहावे. **अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी पालघर यांचे वेबसाईटवर** (www.collectorpalghar.in) **उपलब्ध आहे.**

९) उमेदवारांची मुलाखत **दिनांक २९/०१/२०१८ रोजी सकाळी/दुपारी ११.०० वाजेपासून** घेतली जाईल. सदर दिवशी उपस्थित न राहिलेल्या उमेदवारांचा नंतर पुनश्च: मुलाखतीसाठी विचार केला जाणार नाही.

१०) उमेदवाराने मौखिक परिक्षेसाठी स्वखर्चाने उपस्थित रहावे.

११) एखादया अर्जदाराने त्यांच्या निवडीसाठी निवड समितीवर प्रत्यक्ष / अप्रत्यक्षपणे दबाव आणल्यास त्यास निवड प्रक्रियेतून बाद करण्यांत येईल.

१२) सदर भरती प्रक्रिया निवडीच्या कोणत्याही स्तरावर स्थगित करणे /तहकूब करणे /रद्द करण्याचे अधिकार राखून ठेवण्यात येत आहेत.

इच्छूक उमेदवारांनी दिनांक २९/०१/२०१८ रोजी आपल्या अर्जासह कागदपत्रांच्या साक्षांकित प्रतीसह जिल्हाधिकारी कार्यालय पालघर, भूसंपादन शाखा, पहिला मजला, पार्श्वनाथ-९ बिडको नाका, ता.जि.पालघर येथे सकाळी ११.०० वाजता उपस्थित रहावे.

संचालक
सेतु सुविधा केंद्र, पालघर

**प्रत :-** जिल्हा सूचना विज्ञान अधिकारी, पालघर
२/- सदरची जाहिरात व अर्जाचा नमुना जिल्हाधिकारी पालघर यांच्या संकेतस्थळावर www.collectorpalghar.in वर प्रसिध्द करणेंत यावी.
**प्रत :-** सहाय्यक जिल्हाधिकारी तथा उपविभागीय अधिकारी डहाणू / उपविभागीय अधिकारी पालघर व वसई / तहसिलदार पालघर, वसई, डहाणू व तलासरी
३/- सदरची जाहिरात सूचना फलकावर प्रसिध्द करणेंत यावी.

MICROSONIC PERIPHERALS THANE

संचालक
सेतु सुविधा केंद्र, पालघर

**कंत्राटी प्रकल्प अधिकारी / सहाय्यक प्रकल्प अधिकारी / संशोधन अधिकारी / समन्वयक / डाटा एंन्ट्री ऑपरेटर या पदासाठी मानधन तत्वावर कंत्राटी पध्दतीने नेमणूकीसाठी थेट मुलाखत (Walk-in-Interview)**

**अर्जाचा नमुना**

ज्या पदासाठी अर्ज करावयाचा आहे त्या पदाचे नांव:-

AFFIX YOUR RECENT PASSPORT SIZE PHOTOGRAPH HERE

प्रति,
संचालक,
सेतू सुविधा केंद्र पालघर

(१) संपूर्ण नाव

१) आडनाव :- -------------------------------------------------------

२) स्वत:चे नाव :- -------------------------------------------------------

३) वडिलांचे नाव :- -------------------------------------------------------

(२) पत्रव्यवहाराचा संपूर्ण पत्ता :- --------------------------------------------------------

(पिनकोड सहित) -------------------------------------------------------

-------------------------------------------------------

संपर्कासाठी दुरध्वनी :- -----------------------------------------------------

क्रमांक/ईमेल -----------------------------------------------------

(३) अ) जन्म तारीख :- तारीख महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दिनांक ०१/०१/२०१८ रोजीचे वय ---------- वर्ष--------- महिने --------- दिवस --------

(४) राष्ट्रीयत्व :- भारतीय /अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय? :- होय / नाही

(६) शैक्षणिक अर्हता :-

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परिक्षा | मंडळ विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(७) अनुभव :-

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडल्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासून | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(८) अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी होय/नाही असे लिहावे)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|

(९) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगविषयक प्रकरणव तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय? होय / नाही

(१०) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) ----------------------- २) ----------------------- ३) -----------------------

४) ----------------------- ५) ----------------------- ६) -----------------------

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असून, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्पावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल, याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्दाराची सही/-

दिनांक :-

(नाव :- )